जोडपत्र (अ)

## जाहिरात

## राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे

## (रा.स.नि.प्राधिकरणाच्या वकील तालिकेवरील नियुक्तीसाठी)

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांना मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर पुढे दाखल निवडणूकी विषयक वादामध्ये प्राधिकरण व प्राधिकरणातर्फे प्राधिकृत निवडणूक अधिकारी यांच्यातर्फे न्यायालयात हजर होऊन बाजू मांडणेसाठी व प्रकरणे हाताळण्यासाठी पात्र व इच्छूक अधिवक्त्यांची प्राधिकरणाचे तालिकेवर नियुक्तीसाठी सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे, जुनी मध्यवर्ती इमारत, पुणे, दुरध्वनी क्रमांक- ०२०-२६०५०६४१,२९७०६४११ यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | न्यायालय | तालिकेवर अतिरीक्त अधिवक्त्याची संख्या |
|---|---|---|
| १ | मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर | १ |

(अ) रा.स.नि.प्राधिकरणाच्या मा. उच्च न्यायालयापुढील प्रकरणे चालविण्यासाठी वकील तालिकेवरील नियुक्तीसाठी जाहिरात जोडपत्र (अ) प्रमाणे

(आ) अर्जाचा नमुना जोडपत्र (ब) प्रमाणे

(इ) प्राधिकरणाच्या तालिकेवर नेमणूकीसाठी पात्रता व जोडावी लागणारी कागदपत्रे जोडपत्र (क) प्रमाणे

(ई) अधिवक्त्यांची तालिकेवरील निवडीसाठी मुलाखत पत्र जोडपत्र (ड) प्रमाणे

(उ) प्राधिकरणाच्या तालिकेवर निवडावयाच्या अधिवक्त्याची वैयक्तिक माहिती जोडपत्र (इ)प्रमाणे

(ऊ) निवड समितीची रचना जोडपत्र (ई)प्रमाणे

(ऋ) नेमणूक आदेशाचा प्रारूप मसुदा जोडपत्र (उ) प्रमाणे

(ऌ) विहित नमुन्यातील अर्ज **दि.२५.०५.२०२२** पर्यंत सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे, जुनी मध्यवर्ती इमारत पुणे, दुरध्वनी क्रमांक- ०२०-२६०५०६४१,२९७०६४११ या कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करावा. या तारखेनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

(ऍ) काही उमेदवारांनी जाहिरातीपूर्वी अर्ज सादर केलेले असले तरी त्यांना ह्या जाहीरातीप्रमाणे नव्याने अर्ज सादर करावे लागतील. जाहिरातीपूर्वी सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

(ऐ) अर्जाच्या छाननीत पात्र ठरणा-या उमेदवारामधून तालिकेवरील वकिलांची मुलाखतीव्दारे निवड करण्यात येईल. मुलाखतीचा दिनांक पात्र उमेदवारांना नंतर कळविण्यात येईल. मुलाखतीस उपस्थित राहणा-या उमेदवारांना कोणताही प्रवास खर्च/ भत्ता दिला जाणार नाही.

(ए) प्राधिकरणाच्या तालिकेवर नेमणूक झालेल्या अधिवक्त्यांना प्राधिकरणाने वेळोवेळी विहीत केल्याप्रमाणे प्रकरणपरत्वे वकिली शुल्क देय असेल. याव्यतिरिक्त इतर कोणतेही आर्थिक लाभ मिळणार नाहीत.

(ऐ) उमेदवारांनी आपला अर्ज बंद लिफाफ्यातून सादर करावयाचा असून त्या लिफाफ्यावर **"राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या तालिकेवरील वकिलांच्या नेमणूका "** साठी अर्ज असे ठळक रितीने नमूद करावे आणि त्याच लिफाफ्यात अर्जदाराने अर्जासमवेत रु ३० किमतीची तिकिटे (पोस्टेज स्टॅम्प्स) चिकटविलेला आणि स्वत:चा पत्ता लिहिलेला लिफाफा पाठवावा.

(ऑ) अटी, शर्ती व सूचनांची पूर्तता न करणारे अर्ज छाननीत अपात्र ठरविण्यात येतील.

**(यशवंत गिरी)**
**सचिव**
**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,**
**महाराष्ट्र राज्य पुणे**

**स्थळ –पुणे**
**दि.२५.०४.२०२२**

४३१५

## जोडपत्र -(ब)

## राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर वकिल तालिकेसाठी अर्जाचा नमुना

उमेदवाराचा नजीकच्या काळातील पासपोर्ट साईज फोटो

१. अर्ज केलेले पद –

२. अर्जदाराचे पुर्ण नाव –

३. पत्र व्यवहारासाठी पूर्ण पत्ता/कायमचा पत्ता

फोन नं/मोबाईल नंबर - इमेल आयडी –

४. a) जन्मदिनांक –

b) दि.०१.०१.२०२२ या तारखेस पूर्ण वय - जन्मठिकाण -

५. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी आहे काय?

(अ) अधिवासाचे ठिकाण (ब) राष्ट्रीयत्व –

६. वकीली व्यवसाय करत असलेले न्यायालयाचे ठिकाण –

७. शैक्षणिक अर्हता आणि अनुभव

(अ) उत्तीर्ण केलेल्या पदवी, पदव्युत्तर व विधि पदवी, पदव्युत्तर परिक्षा याचे विवरण –

| परिक्षेचे नाव | बोर्ड/ विद्यापीठ संस्थेचे नाव | उत्तीर्ण श्रेणी /ग्रेड | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष |
|---|---|---|---|
| माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र | | | |
| उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र | | | |
| कला/वाणिज्य/विज्ञान पदवी प्रमाणपत्र | | | |
| विधी पदवी प्रमाणपत्र | | | |
| पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र | | | |

(ब) एकूण वकिली व्यवसायाचा कालावधी –

| उच्च न्यायालय/न्यायालय जेथे वकिली व्यवसाय करता ते ठिकाण / ठिकाणे - | उच्च न्यायालय/ न्यायालयामध्ये चालविलेले एकूण रिट याचिका निवडणूक वाद, अपील रिव्हिजन | इतर प्रकरणे |
|---|---|---|
| | | |

(क) उच्च न्यायलय यांचेपुढे नेमणूकीसाठी अर्ज करण्या लगतपूर्वी तीन वर्षात चालविलेल्या एकूण सहकार निवडणूक वादाची प्रकरणे / अपिल, रिव्हीजन, रिट याचिका.

(ड) सदर प्रकरणे खाली नमूद विवरणपत्रात द्यावीत.